# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

**४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.**

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web Site : - www.ropune.org.in


जा क्. विकापु/विवि/पदविका प्रवेश/२०१०-११/ ८०३६ दिनांक 30 SEP 2010

प्रति,

प्राचार्य,
शासकीय अनुदानित अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र व इतर तत्सम संस्था,
सर्व विनाअनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्था,

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१०-११ मधील १० वी व १२ वी नंतर च्या अभियांत्रिकी प्रवेशाच्या प्रवेशित गुणवत्ता यादया प्रमाणित करुन घेणेबाबत.

संदर्भ :- १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे नोटीफिकेशन नं १०/एडीएम/डिप्लोमा/२०१०/४३४ दिनांक ३०/०७/२०१०
२. या कार्यालयाचे पत्र क्र. विकापु/विवि/प्रवेश/२०१०-११/८९५८ दि. २३/०९/१०.

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये पदविका अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांचे प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत तसेच गुणवत्ता यादया सादर करण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्र. २ अन्वये कळविले आहेत. त्याप्रमाणे ज्या संस्थांनी या कार्यालयात प्रवेशित यादी सादर केलेली आहे. व ज्या संस्थांनी अद्याप यादी सादर करावयाची आहे अशा संस्थांनी सोबत दिलेल्या तक्त्यामधील वेळापत्रकाप्रमाणे प्रवेशित गुणवत्ता यादी तपासणीसाठी त्यांना दिलेल्या दिनांकास सर्व मूळ प्रमाणपत्रांसह जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांनी उपस्थित रहावयाचे आहे. संस्थांना त्यानां दिलेल्या दिनांकास उपस्थित राहू शकली नाही तर या कार्यालयाच्या सोयीनुसार त्यांची प्रवेशित गुणवत्ता यादी तपसणी केली जाईल. त्यामुळे नोंदणी अर्ज भरण्यांस विलंब झाला व तंत्रशिक्षण मंडळाने विलंब शुल्क आकारणी केली तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील. याची कृपया नोंद घ्यावी. तसेच यादीची तपासणी ठरविलेल्या दिवशी झाली नाही तर बाहेर गावावरुन येणा-या संस्थांच्या प्रतिनिधींना मुक्कामी रहावे लागेल याची नोंद घ्यावी .

प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी सादर करताना २०% संस्था स्तरावरील प्रवेश व ८०% गुणवत्ता यादीतील प्रवेश (केंद्रिभूत प्रवेश) स्वतंत्रपणे सादर करावे. तसेच रिक्त जागांवरील प्रवेश याची (Vacancy Against Cap ) याची यादी स्वतंत्रपणे सादर करण्यांत यावी. प्रवेश रद्दीकरण केल्याचे प्रपत्र सादर करण्यांत यावेत. प्रवेश रद्दीकरण जर कटऑफ दिनांकानंतर केले असल्यास त्या जागांवर पुर्वप्रवेश करता येणार नाही. रद्दीकरणाबाबत फी परतावा केल्याचे सर्व कागदपत्र सादर करण्यांत यावीत.

प्रवेशित गुणवत्ता यादी सादर करताना प्रत्येक पानावर सही आवश्यक आहे. वेबसाईटवरील सर्व प्रोफामा सोबत जोडण्यांत यावेत. तसेच शैक्षणिक वर्ष २०१०-११ च्या नियमावलीमधील ॲनेक्चर ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सर्व मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी सादर करावयाची आहे. तसेच जातीची प्रमाणपत्रे नियम क्र ७ मध्ये दर्शविलेल्या अधिका-यांनी जारी केलेले असावे. **ज्या संस्था केंद्रिय प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी नाहीत अशा संस्थांच्या गुणवत्ता यादी तपासण्याबाबत सूचना स्वतंत्रपणे दिल्या जातील याची नोंद घ्यावी.**

(डी. एन. शिंगाडे )
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

**शैक्षणिक वर्ष २०१०-११ अभियांत्रिकी पदविका खालील संस्थांनी त्यांचे संस्थाकोड प्रमाणे दिलेल्या दिनांकास उपस्थित रहाणेबाबत.**

| अ.क्र. | संस्थांचे डीटीई कोड नंबर | संस्थेने तपासणी करीता उपस्थित राहणेबाबत. |
|---|---|---|
| १ | ६०१६,६०२१,६४०८,६४१४,६४१५,६४१३,६४१०,६४१६,६४१७ | ०४/१०/२०१० |
| २ | ६७१५,६७१७,६४१७,६४२३,६४२७,६४४९,६४३२,६४३५,६४४१ | ०५/१०/२०१० |
| ३ | ६४४५,६४३८,६४६९,६४६१,६४५६,६५४४,६४५०,६४०६,६४०७ | ०६/१०/२०१० |
| ४ | ६४०२,६४११,६२२२,६४२१,६४२८,६४३९,६४७२,६७१८,६७२० | ०७/१०/२०१० |
| ५ | ६४७५,६२५९,६४३३,६४७६,६४६५,६४५९,६४६३,६२६९ | ११/१०/२०१० |
| ६ | ६४०३,६४२२,६४४८,६४४०,६४७३,६४७०,६४६४,६४५५,६४५२, | १२/१०/२०१० |
| ७ | ६४१२,६४४४,६४३१,६४७१,६४६७,६४५३,६४५८,६७१२,६७१३, | १३/१०/२०१० |
| ८ | ६४५४,६७१६, ६२३७, ६०२८, ६५२८ | १४/१०/२०१० |

**शैक्षणिक वर्ष २०१०-११ औषधनिर्माणशास्त्र पदविका खालील संस्थांनी त्यांचे संस्थाकोड प्रमाणे दिलेल्या दिनांकास उपस्थित रहाणेबाबत.**

| अ.क्र. | संस्थांचे डीटीई कोड नंबर | संस्थेने तपासणी करीता उपस्थित राहणेबाबत. |
|---|---|---|
| १ | ६४८०,६४७८,६४८५,६२५७,६४९५,६४९९,६४९३,६५२४, | ०४/१०/२०१० |
| २ | ६४८६,६५१५,६५०६,६१२५,६५१२,६५०७,६४८९,६४९६, | ०५/१०/२०१० |
| ३ | ६४९२,६५०१,६५१६,६५०३,६५०९,६५९७,६४८१,६४८२,६४८९ | ०६/१०/२०१० |
| ४ | ६३५६,६५२०,६४९१,६४९४,६५०९,६५०४,६०२३,६०२५,६०२६,६०२४ | ०७/१०/२०१० |
| ५ | | |

(डी.एन. शिंगाडे )
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.